D-64

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०

संदर्भ : रासेयो-२०१९-२०/२८७

दि. ३० Aug २०१९

प्रति,
मा.प्राचार्य,
**कल्याणी चॅरीटेबल ट्रस्ट रवींद्र गंभीरराव सपकाळ कॉलेज ऑफ फार्मसी पत्ता: सपकाळ नॉलेज हब कल्याणी हिल्स अंजनेरी व्यबकेश्वर ना्िशक ता.: त्र्यंबकेश्वर जि: नाशिक पिनकोड: 422213**

**विषय: सन २०१९-२०२० या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना एकक मान्यता.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० साठी आपल्या महाविद्यालयास ५० रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक (**पन्नास**) संख्येचे एकक मंजूर करण्यात येत आहे. याकरिता आपल्या महाविद्यालयास रू.२१० प्रती विद्यार्थी x ५० रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक संख्या = रु **१०५००** या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येत आहे. मंजूर अनुदानापैकी ७०% अनुदानाचा प्रथम हप्ता आपल्या रासेयो खात्यावर इ सी एस/एन ई एफ टी द्वारे वर्ग करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या SC -११.८%,ST-९.४% व Other-७८.८% या संवर्गनिहाय तरतूदीनुसार रासेयोमध्ये स्वयंसेवकांना प्रवेश द्यावेत. त्यानंतर अल्पसंख्यांक विद्यार्थी संख्या स्वतंत्ररित्या नमूद करावा. प्रवर्गनिहाय संख्येनुसार रासेयो महाविद्यालयांना नियमित कार्यक्रमाचे अनुदान शासनामार्फत उपलब्ध होणार आहे याची नोंद घ्यावी.

२. महाविद्यालयाने रासेयो मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. अतिरिक्त विद्यार्थी संख्येची संपूर्ण जबाबदारी सबंधित महाविद्यालयाची राहील.

३. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निवड केलेल्या स्वयंसेवकांच्या नावांची वर्गनिहाय व प्रवर्गानुसार यादी रासेयो कार्यालयास online जमा करावी. (यादी पाठविल्यानंतर त्यात कुठल्याही परीस्थितीत बदल होणार नाही.)

४. रासेयो मासिक अहवाल (Monthly Report) प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अपलोड करणे बंधनकारक आहे.

५. महाविद्यालयास स्वतंत्र पत्रव्यवहार न करता उपक्रमांसंदर्भात (www.unipune.ac.in/nss) या रासेयो लिंकवर वेळोवेळी परिपत्रके प्रसिद्ध केली जातील. त्यानुसार महाविद्यालयांनी कार्यक्रम आयोजित करून सदर अहवाल, छायाचित्र इ. रासेयो Web Portal वर तयार केलेल्या ठिकाणी अपलोड करावीत.

६. रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरे ह्या दरम्यान संचालक, रासेयो,विभागीय समन्वयक , जिल्हा समन्वयक पूर्वसूचना न देता भेट देतील. त्यामुळे रासेयो कार्यक्रमांची व शिबिरांची नियमितता व सुसूत्रता अबाधित ठेवण्याची सर्व जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची आहे.

७. प्रत्येक रासेयो एककाने दरवर्षी अध्यादेश १६३ बाबत रासेयो स्वयंसेवकांना परीक्षेपूर्वीच अवगत करावे आणि परीक्षेपूर्वीच त्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत online भरणे अत्यावश्यक आहे. याबाबत परीक्षेअगोदर रासेयो स्वयंसेवकांमध्ये जागृती करावी.

८. केंद्र व राज्य शासनाने निर्धारित केलेल्या रासेयो कृतिकार्यक्रमांचे आयोजन व अंमलबजावणीची जबाबदारी आपल्या एककावर अपरिहार्यपणे येते. ह्या सर्व बाबींचे काटेकोर पालन व निर्धारण करण्याच्या अटीवर आपल्या रासेयो एककास मान्यता देत आहे.

कळावे, ही विनंती.

***टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.***

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**